# गांधी आणि नेहरूंचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

**संदीप तुंडूरवार,** पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय,नागपूर

---

**विषय प्रवेश –** भारतीयांना गांधी आणि नेहरू यांच्यातील नाते जे परिचीत आहे ते गुरू आणि शिष्य म्हणून. म. गांधींनी जवाहर माझा वारस असेल असे निसंदिग्धपणे स्पष्टही केले होते. नेहरूंनी राजकीय वारसाची भूमिका गांधीकडून घेतलेली असली तरी त्या दोघांमध्ये वैचारिक सूत्राच्या बाबतीत मात्र द्वंद होते. राजकीय, आर्थिक, शिक्षण, सांस्कृतिक या क्षेत्रातील विभिन्न प्रश्नावर दोघांच्या भूमिकांमध्ये अंतर दिसून येते, असे असूनही नेहरू गांधीचे वारस ठरतात ते मात्र तपशिलात जाऊन समजून घ्यावे लागते. गांधीची जी बैठक आहे विशेषतः साध्य साधने, सत्य–अहिंसा ही बैठक नेहरूंना मान्य होती व शेवटपर्यंत त्यावर ठाम राहिलेत. वैश्विक शांतता प्रस्थपित करण्यास धजावलेला एक कृतीप्रवण नेता असेच त्यांचे स्थान राहिलेत. भारतीय परंपरेत गुरू–शिष्यांच्या नात्यात द्वंद मान्यच नाही. त्यामुळे येथील नातेसंबंध अंधानुकरणाच्या किंवा अनुनयाच्या पातळीवर लक्षात घेतल्या जाते अथवा गुरूंच्या विचाराचा ऱ्हास करणारा स्वार्थी व्यक्ती अशीच ओळख निर्माण केली जाते. पाश्चात्य जगतात मात्र मुलभूत प्रमेयांना घेऊन पुढे जाणारा परंतु जिथे द्वंद आहे तिथे सडेतोड त्यातील दोष दाखवून देणारा आणि नवी सर्जनशिलता, नवे प्रमेय आकारास आणणारा असा संदर्भ गुरू–शिष्यांच्या संदर्भात घेतल्या जातो. तेथे हे नाते डोळसपना, तर्कवाद, विषयप्रमेय यावर ठरविले जाते. भारतात मात्र नेमक्या उलटया रितीने विचारात घेतल्या जात असल्याने मोकळेपणा आणि नाविन्यता यामध्ये अभाव दिसतो. ग्रीस परंपरेत एक साखळी साक्रेटीस–प्लेटो–ॲटिस्टॉटल–सिकंदर अशी मांडल्या गेली. परंतु यांच्यातील वैचारिक सूत्र मात्र नेहमीच भिन्न राहिलेत म्हणून ते गुरू–शिष्य या चौकटीत येत नाही असे नव्हे. उलट ती परंपरा अत्यंत समृध्द माणल्या गेली. विद्यार्थी, अभ्यासक या दृष्टीने विचार करता गांधी–नेहरू यांच्यात भिन्नता असली तरी ती वारसाच्या दृष्टिने एका निश्चित सूत्रात बांधल्या गेली आहे. हे लक्षात घेतले तर अभ्यास विषयाला उलगडणे कठीण नाही. गांधी–नेहरू यांच्यातील शिक्षण विषयक विचार त्या आधारावर पाहावा लागतो.

**म. गांधीचा शिक्षण विषयक दृष्टिकोन–** म. गांधीचे 'हिंद स्वराज' येण्यापूर्वीपासुनच त्यांचे शिक्षण विषयक ठोकताळे तयार होऊ लागले होते. द. आफ्रिकेतील फिनीक्स आश्रम असो अथवा टॉलस्टॉय आश्रम येथील जीवन पध्दती. त्यांच्या शिक्षण विषयक विचाराचे बिजारोपन दिसून येते. इंग्रजी भाषेऐवजी मातृभाषेतून शिक्षण देणे आणि मुलोद्योगी, शरीरश्रम, स्वावलंबी जीवनाचा मंत्र ठरणाऱ्या शिक्षणाची सूत्रे त्यात दिसून येतात. आपल्या मुलांना विलायती शिक्षण न देता आश्रम पध्दतीतून दिले जाणारे शिक्षण त्यांनी घ्यावे व उत्कर्षाच्या बिंदूपर्यंत पोहचावे अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. गांधी स्वतः इंग्लंडमध्ये शिकलेत, विविध भाषांवर प्रभुत्व संपादन केलेत असे असले तरी त्यांची भूमिका मात्र भिन्न होती. त्यातूनच पुढे 'नई तालीम' किंवा 'बुनीयादी शिक्षण' अथवा शिक्षणाचा 'वर्धा आकृतीबंध' या नावाने तो तयार झाला. अन् आजही तो कृतीप्रवण आहे. गांधी शिक्षणाच्या संदर्भात आपला दृष्टिकोन मांडतांना म्हणतात, 'माझ्या अभिप्रायानुसार शिक्षण म्हणजे मुलातील अन् मनुष्यातील शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अतिउत्तमतेचा सर्वांगिण आविष्कार होय.'[1] साक्षरता म्हणजे शिक्षणाचा अंतही नाही नी प्रारंभही नाही. मनुष्य आणि स्त्रीला सुशिक्षित करण्याचे साक्षरता हे अनेक साधनांपैकी एक साधन होय. साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. केवळ लिहिता वाचता येणे या अर्थाने शिक्षण ही संज्ञा मर्यादित नाही. मनुष्यातील अत्युत्तमतेचा आविष्कार 'शिक्षण' या संज्ञेत आहे. गांधीची शिक्षण संकल्पना मुळातूनच मुलोद्योगी, नैतिकता, सामाजिक जबाबदारी यावर आधारित होती. तिला मूर्त स्वरूप देण्याच्या दृष्टिने 22 व 23 ऑक्टोबर 1937 ला वर्धा येथे गांधीच्या अध्यक्षतेखाली मान्यवर आणि अन्य यांचे संमेलन आयोजित करण्यात आले.[2] यामध्ये डॉ. झाकीर हुसैन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. या समितीने 1937 व 1938 मध्ये आपला अहवाल सादर केला. अहवालातील बाबी प्रस्तावाच्या रूपाने हरिपुरा येथील काँग्रेसच्या अधिवेशनात मांडल्या गेल्या व त्या मंजूर झाल्या, त्यातून शिक्षणाच्या संदर्भातील गांधीचा दृष्टिकोन आणि रूपरेखा यांची स्पष्टता दिसून येते. बालकेंद्री शिक्षण, अनिवार्य, निःशुल्क शिक्षण, श्रमप्रतिष्ठा जोपासणारे, उद्योगी आणि किमान सात वर्षे प्राथमिक शिक्षण अशा स्वरूपाची ती रचना होती. गांधी म्हणतात, "I had given the for place to the culture of the health or the building of character and felt confident that moral training could be given to all alive matter how different their ages or upfriing." [3]

गांधी व्यक्तीच्या सर्वांगिन विकासाच्या आधारावर शिक्षण संकल्पना मांडतात. बौध्दिक, मानसिक आणि शारीरिक वाढीला ती पुरक असावी या अर्थाने "Three H" अशी मांडणी आहे.

**शिक्षण**

| Head | Heart | Hand |
|---|---|---|
| । | । | । |
| बुध्द | मन | शरीर |
| । | । | । |
| विचार | भावना | कृती |
| । | । | । |
| ज्ञानात्मक | भावनात्मकता | क्रियात्मक |

↘ ↓ ↙

सर्वांगीन विकास[4]

शिक्षणात ज्ञानात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक या तिन्ही संस्काराचा अंतर्भाव असला पाहिजे तेव्हाच मनुष्याचा सर्वांगीण विकास साधता येईल. गांधीची शिक्षण संकल्पना परिपूर्ण विकासावर अवलंबून आहे.

**नेहरूंचा शिक्षण विषयक दृष्टिकोन–** नेहरूंचा शिक्षण विषयक दृष्टिकोन नव्या संदर्भाना घेऊन जाणारा होता. पाश्चात्य जगतातील बदल, शिक्षण क्षेत्रातील घोडदौड, संशोधन विकास आणि आपल्याही राष्ट्राला मजबुत बनविण्याची त्यांची उर्मी ही त्यांनी घेतलेल्या, प्राप्त केलेल्या शिक्षणातून मिळालेली होती. एका ठिकाणी नमूद करतांना ते म्हणतात 'मै भारत पश्चिम से आया....। मै

इसके दृष्टिकोन और छवी में परिवर्तन करने और उसे आधुनिकता का रूप देना चाहता हुँ।[5] पुढे त्यांना जेव्हा संधी मिळाली तेव्हा शिक्षण, उच्च शिक्षण क्षेत्रातील अनेक नवे प्रारूप, घटनात्मक संस्था, त्यांचे नियोजन यांना त्यांनी हातभार लावला. त्यांची शिक्षण विषयक दृष्टि सर्वांगीण विकासाची असली तरी त्यास पाश्चात्य अभिजात असणाऱ्या पध्दतीचा प्रभाव होता. देशाला उच्च स्थानावर पोहचवायचे असेल आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करावयाचा असेल तर विद्यापीठीय शिक्षण व्यवस्था व त्याचा आकृतीबंध त्यांना मान्य होता. 1948 मध्ये डॉ. राधाकृष्णम यांच्या अध्यक्षतेखाली विख्यात शिक्षण तज्ञांना प्राचारण करून 'विद्यापीठ अनुदान आयोगाची' स्थापना केली. त्यात परिस्थितीनुरूप परिवर्तन झालेत, होत असले तरी नेहरूंच्या काळात जी पायाभरणी झाली त्याची चौकट मोडणे सफल झाले नाही. नेहरूंच्या शिक्षण पध्दतीचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी शहरी विद्यापीठांना जशी चालना दिली तशीच ग्रामीण विद्यापीठ, कृषी विद्यापीठ, उभारणीस उत्तेजन देऊन विविध पातळयावरील ज्ञानकेंद्रांना विकसीत केल्याचा व स्थानिक व्यवस्थेशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मूर्तरूपाने सूत्रपात केलेला नसला तरी शिक्षणाची आपली भूमिका स्पष्ट करतांना नेहरू म्हणतात 'देश अथवा शासन चालविण्याकरिता विज्ञान, तंत्रज्ञान, समाज वैज्ञानिक दृष्टिकोन यांची गरज आहे. तेव्हाच भारतातील गरीबी, अज्ञानता, दारिद्रय, उपासमार, अंधविश्वास दूर होईल'[6] भारतातील व्यवस्थेला शापीत ठरलेल्या ज्या वरील बाबी आहे त्यांचा निपाःत करावयाचा असेल तर आधुनिक पाश्चात्य शिक्षण पध्ततीचा विचार करावा लागेल, त्याला विरोध करणे म्हणजे पुन्हा देशाला अंधकार व असाहय्यतेच्या गर्तेत लोटल्या सारखे होईल. नेहरू आपला दृष्टिकोन स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर सत्तेत आल्यानंतरही ठाम राहून रेटत होते. विज्ञान, तंत्रज्ञान विनाश घडवितो या एकाच कारणामुळे त्याची वर्तमान उपयुक्तता पुसून टाकता येत नाही असेही ते बजावतात. 1945 मधील हिरोशिमा–नागासाकी येथील घटनेवर भाष्य करताना ते म्हणतात. 'अणुबॉम्बमध्ये असलेली आण्विक शक्ती मानवी संहाराच्या दृष्टिने उपयोगात न आणता तिचा माणसाच्या भल्यासाठी, शांततेसाठी काही विकासासाठी उपयोग केला असता तर त्यातून मानवी समृध्दता वाढली असती.'[7] आज जगभरात अणुशक्तीचा वापर उर्जेकरिता होतांना जेव्हा दिसतो त्यावेळी नेहरूं काळाच्या किती पुढे होते हे लक्षात येऊ लागते. नेहरूंनी विज्ञानवादी समाजाच्या निर्मितीकरीता प्रगत व आधुनिक शिक्षण पध्दतीचा विचार मांउला. ज्यामुळे रोजगार, सशक्तीकरण, शहरीकरणाचा विकास व ग्रामीण समस्यांचे निर्मूलन घडून येईल. त्यांच्या शिक्षणसूत्रात पाश्चात्य शैलीचा प्रभाव दिसून येतो.

**शिक्षणातील तुलना -** गांधी आणि नेहरू यांच्यात एका पिढीचे अंतर आहे. म्हणजेच नेहरू गांधीपेक्षा वयाने 20 वर्षानी लहान आहेत. दोघांच्याही गुणवैशिष्टयांचा विचार केला तर दोघेही इंग्लंडमध्ये शिकलेत, बॅरिस्टर झालेत, दोघांनीही वकीली केली नाही. स्वातंत्र्य आंदोलनाचे केंद्रबिंदु ठरलेत. आधुनिक जीवनपध्दीचा प्रभाव, वावर दोघांमध्येही राहिला. विशेषतः आंदोलनाने दोघांनाही साधे राहण्याची, पाश्चात्य शैलीतील राजसीपणा सोडून द्यावासा वाटून सामान्याचे नेते म्हणूनच वावरावेत असे असले तरी दोन्ही प्रकृतीत भिन्नता आहे. ते शिक्षण योजनेतही दिसून येते. गांधी मन, मेंदू, शरीर यांच्या विकासाला पायाभूत मानुन शिक्षणाचा भिन्न प्रयोग करतात आणि त्यातून घडणारी व्यक्ती ,समाज, देश यांच्या दृष्टीत जशी लाभाची राहिल त्याचप्रमाणे व्यक्तीगत पातळीवर नैतिकताप्रधान बनेल. एका अर्थाने गांधी प्राचीन आणि अर्वाचिन यांच्यातील चांगल्या मूलभूत तत्वाला एकत्रित आणुन कृतीशील समाजाची कल्पना करतात. तर नेहरू नैतिकताप्रधान, देशनिष्ठ समाजाची अपेक्षा करतात. केवळ पाश्चात्य व वैदिक दाखल्यांनाच ग्राहय मानत नाही तर ज्या युरोपाने अभिव्यक्ती, विज्ञानवाद, सहिष्णूतावाद यांचे धडे देण्याकरिता प्रचंड परिश्रम घेतलेत, मनःस्ताप आणि जीवनाची आहूती दिली, त्या आधुनिक विचाराला आकारणी देणाऱ्या बडया विश्वविद्यालय, महाविद्यालये, उच्चशिक्षण यांचा विचार मांडतात. विद्यापीठे खाजगी असण्याऐवजी त्यांचा राष्ट्रीय असण्यावर भर आहे. कारण भारतात सर्वांना शक्य होईल असे शिक्षण घेण्याची ऐपत नसणारा वर्ग अधिक आहे. त्यामुळे भेदभव नाकारणाऱ्या शिक्षणास ते पसंती देतांना दिसतात. त्याचप्रमाणे धर्म वैयक्तिक जीवनात मोक्षप्राप्तीचे साधन असला तरी सार्वजनिक जीवनात तो मात्र इतरांचा कपाळमोक्ष करणारा ठरतो. त्यामुळे शिक्षणात धर्म त्याची लुडबुड नेहरूंना मान्य नव्हती. बालशिक्षणाचा पुरस्कार करतांनाही नेहरूंनी वर्तमानाशी नाळ जुळणाऱ्या आधुनिक शिक्षण पध्दतीचा केवळ विचारच मांडला नाही तर अनेक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, अणुशक्ती, अवकाश यांच्या संस्था उभारणीला सहाय्य केले. पाठिंबा दिला त्यामुळे आजचा भारत घडतांना दिसतो आहे. गांधी–नेहरू यांच्या शिक्षण सेवेत वरवर पाहता भिन्नता दिसते. मात्र त्यांचा आत्मा मात्र एकच दिसतो.

**समालोचन -** नव्या भारताच्या पायाभरणीत गांधी–नेहरूंचे योगदान अचल आहेत. दुसरे म्हणजे नेहरू अनुनय, रंजन यांच्या पलीकडे जात नवी मानदंडे तयार करतांना दिसतात. तद्वतच गांधीचे मूलभूत तत्वज्ञान हरवणार नाही याची काळजी घेतांनाही दिसतात. गांधीचा शिक्षण सिध्दांत त्यांना मान्य होता. त्यामुळेच वयाच्या 14 वर्षा पर्यंत मोफत व अनिवार्य शिक्षण याची तरतूद मार्गदर्शक तत्वात राखण्यास त्यांनी कष्ट घेतलेत. त्यातूनच आज वयाच्या 14 व्या वर्षापर्यंत शिक्षण घेण्याचा मूलभूत अधिकार प्राप्त करून घेता आला. सध्याच्या जागतिक विवंचनेत गांधीची शिक्षण पध्दती समर्पक ठरत आहे. पर्यावरण, रोजगार, शाश्वत विकास, स्थलांतरण, नैतिकता, मानवता या दृष्टीने गांधीनी नई तालीम, नवी गरज अधोरेखीत करीत आहे. दुसऱ्या बाजूला नेहरूंनी घेतलेला दृष्टीकोन समर्पक आहे, हे ही समजून घ्यावे लागेल. बदलत्या जगाच्या गरजा लक्षात घेऊन आपण वाटचाल केली नाही तर गुलामीचा फास आवळायला वेळ लागणार नाही पण यातून निर्माण झालेले दोष दूर करावे लागेल ते दूर सारणे फारसे अशक्य पण नाही. गांधी–नेहरू यांच्यातील द्वंद लक्षात न घेता त्याचा सांधा जुळला तर भारतातील अनेक गंभीर प्रश्न मार्गी लागतील त्या दृष्टीने हा विषय समजून घेऊन कृती करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. हिंद स्वराज,गांधी,मो.क,परंधाम प्रकाशन,पवनार,२००७,पृष्ठ.क्र,६६

२. भारतीय शिक्षण पध्दतीचा विकास,प्रतिभा पेंडके,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर,२००७, पृष्ठ.क्र,१८१

३. म.गांधीची विचारसृष्टी,यशवंत सुमंत,साधना प्रकाशन,पुणे,२०१६, पृष्ठ.क्र,२४

४. मेरे सपनो का भारत,गांधी,मो.क,सर्व सेवा संघ प्रकाशन,राजघाट, पृष्ठ.क्र,६६

५. आधुनिक भारतातील राजकीय विचार,भा.ल.भोळे,पिंपळापूरे पब्लिकेशन,नागपूर,२००३, पृष्ठ.क्र,७३६

६. आधुनिक भारताचे विचारस्तंभ,रामचंद्र गुहा, रोहन प्रकाशन,पुणे,२०१८, पृष्ठ.क्र,३६६

७. जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व,माधव गोडबोले,राजहंस प्रकाशन,पुणे,२०१४, पृष्ठ.क्र,३३